राज्यातील जिल्हा परिषदांना निधी वितरणासाठी LRS (Liability Register System) प्रणाली राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः विकास-२०१७/प्र.क्र. २७२/योजना-६

बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीख: ३१ मार्च,२०१८

प्रस्तावना :-

राज्य शासनामार्फत जिल्हा परिषदांना विविध योजनांसाठी निधी वितरीत केला जातो. शासनस्तरावरून दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार कामांच्या निविदा तयार केल्या जातात. त्यानुसार कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश दिला जातो. कंत्राटदारांनी केलेल्या कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने कार्यकारी अभियंता यांच्याकडून देयक तयार केले जाते.यानंतर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी सदर देयकाची तपासणी केल्यानंतर ते अदा केले जाते. या प्रक्रियेमध्ये ब-याच वेळा निधी जिल्हा परिषदांकडे पडून राहतो. काही वेळा देयक अदा करण्यास विलंब होतो. तसेच मंजूर कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त करणे,निविदांना मिळणारा प्रतिसाद व इतर तांत्रिक बाबींमुळे काम पूर्ण होण्यास अधिक कालावधी लागत असल्याने निधी अखर्चित राहतो. तोपर्यत हा निधी जिल्हा परिषदेच्या बँक खात्यांमध्ये पडून रहातो. परिणामी राज्याच्या एकत्रित निधीतून जिल्हा परिषदांकडे अशा प्रकारे हस्तांतरित किंवा अभिकरण तत्वावर दिलेल्या योजनांचा निधी हा बँक खात्यामध्ये पडून राहतो. कित्येकदा दोन आर्थिक वर्षातही निधी खर्च न झाल्याने पुन्हा एक आर्थिक वर्षात अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी मागविण्यात येते. काही जिल्हा परिषदांमध्ये पैसे खर्च न करता प्रलंबित असतात व त्याचवेळी त्याच लेखाशीर्षाखालील योजनेचे बिल इतर जिल्हा परिषदांमध्ये निधीअभावी अदा केले जात नाही. प्रत्येक वेळी पूर्वी वितरीत केलेला निधी खर्चित झाल्याची खात्री पटवण्यासाठी उपयोगिता प्रमाणपत्राची मागणी करावी लागते. तसेच एखाद्या प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे किंवा एखाद्या टप्प्यावर एखाद्या योजनेचे शासनावर किती दायित्व (Liability) आहे, याची खातरजमा करण्यासाठी वेळोवेळी प्रत्येक जिल्हा परिषदेकडून माहिती संकलित करावी लागते.

या सर्व प्रशासकीय अडचणी, त्रुटी व अकार्यक्षमता दूर करण्यासाठी व केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार शासकीय कार्यालयातील सर्व आर्थिक व्यवहार रोखरहीत, धनादेशरहित व डिजीटल पध्दतीने करण्याविषयी आदेश असल्यामुळे ग्राम विकास विभागाने

LRS (Liability Register System) ही संगणक प्रणाली ICICI बँकेच्या सहयोगाने विकसित केली आहे. याबाबत पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक:-

१. ग्राम विकास विभागामार्फत स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये एक स्वतंत्र खाते उघडण्यात येईल. आवश्यकतेनुसार शासन स्तरावरुन अधिदान व लेखा कार्यालयातून निधी आहरित करुन या खात्यामध्ये ठेवण्यात येईल. ही प्रणाली थेट प्रदानाकरिता ICICI बँकेमार्फत राबविण्यात येईल. या करिता ICICI बँकेमध्ये झिरो बॅलन्स या तत्वावर अकाऊंट उघडण्यात येईल. ICICI बँकेस प्रदानाकरिता आदेश दिल्यानंतर बँकेने T+३ या कालावधीत लाभार्थ्यांच्या/ कंत्राटदाराच्या खात्यात थेट प्रदान करणे आवश्यक आहे.

२. सदर **LRS (Liability Register System) ही** संगणकाधारीत वेबबेस्ड प्रणाली राहील. यामध्ये प्रशासकीय मान्यता शासन स्तरावरुन नोंदविली जाईल. प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्यानंतर जिल्हा परिषद निविदा प्रक्रिया पार पाडेल व निवडण्यात आलेल्या निविदाधारकाची माहिती संबंधित कार्यान्वयन अधिकारी या प्रणालीवर भरेल. यामध्ये बँक खाते क्रमांक, IFS CODE इत्यादीचा समावेश राहील. ही माहिती भरल्यानंतर प्रणाली एक संगणक निर्मित संकेतांक (Computer generated code) LRS कोड निर्माण करेल. हा संकेतांक नमूद केल्याशिवाय कोणताही कार्यारंभ आदेश देता येणार नाही.

३. यानंतर जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यारंभ आदेश देण्यात येईल व कामाच्या प्रगतीनुसार प्रचलित कार्यपध्दतीनुसारच बिल/ देयक मंजूर करण्यात येईल. ज्यावेळी देयक पारित होईल त्यावेळी आहरण व संवितरण अधिकारी उदा. कार्यकारी अभियंता त्या प्रणालीत प्रत्यक्ष प्रदानासाठी मान्य रक्कम वजातीसह नोंदवेल. नियमित कार्यालयीन पध्दतीप्रमाणे प्रत्यक्ष देयक मुख्य लेखा वित्त अधिकारी यांच्याकडे जाईल. मुख्य लेखा वित्त अधिकारी यांनी देयक पारित केल्यानंतर प्रणालीवरील देयकाची रक्कम व प्रत्यक्ष देयकावरील रक्कम वजातीसह तपासून देयक पारित करेल व आहरण व संवितरण अधिका-याने मान्य केलेली रक्कम प्रणालीवर पारित करेल.

४. अशी सर्व जिल्हा परिषदांना पारित केलेली रक्कम प्रणालीव्दारे ग्राम विकास विभाग स्तरावरील नियंत्रक अधिकारी यांना दिसेल. त्यानुसार एकत्रित रक्कम SBI मधील खात्यातून काढून ती रक्कम ICICI बँकेच्या Zero Balance खात्यात वर्ग केली जाईल. ICICI बँकेमार्फत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पारित केलेल्या व आहरण व संवितरण अधिका-याने मान्य केलेल्या यादीनुसार, सदर प्रणालीव्दारे पाठविलेल्या यादीप्रमाणे **प्रथम नोंदणी करणा-यास प्रथम प्राधान्य (First come first serve)** या तत्त्वावर संबंधितांचे खात्यात ही रक्कम जमा केली

जाईल. कंत्राटदाराच्या देयकातील वजातीची रक्कम संबंधित आहरण व संवितरण अधिका-याच्या खात्यात जमा केली जाईल. त्यांनी ती आवश्यक शासकीय खात्यात जमा करावी.

५. सदर प्रणाली पुढील आर्थिक वर्षापासून(एप्रिल २०१८ पासून) सर्वच योजनांना लागू असणार असून या आर्थिक वर्षात सर्वप्रथम ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम(ब- वर्ग) या योजनेसाठी राबविण्यात येणार आहे. तरी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेची सर्व देयके केवळ **LRS (Liability Register System) या प्रणालीमार्फत करण्यात येतील. सदर योजनेची देयके या प्रणालीवर नोंदणी करण्याबाबत संबंधितांनी दक्षता घ्यावी.**

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११६०२१३४८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2018.04.05 15:49:03 +05'30'

(असीम गुप्ता)
सचिव,ग्रामविकास व पंचायत राज,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री(ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव,
२. मा.राज्यमंत्री(ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव,
३. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
४. महालेखापाल(लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
५. विभागीय आयुक्त,आयुक्त कार्यालय,सर्व विभाग,
६. जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,सर्व जिल्हे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सर्व जिल्हे
८. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद,सर्व जिल्हे

९. जिल्हा कोषागार अधिकारी,सर्व जिल्हे

१०.नियोजन विभाग,(का-१४४४) मंत्रालय,मुंबई-३२

११. वित्त विभाग(व्यय १५,अर्थसं-१६,अर्थसं-१७),मंत्रालय,मुंबई-३२

१२. कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३.निवड नस्ती(का.यो-६), ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई